Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 21 October 2024

Time: 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

**दिनांक: २१ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

पोलिस स्मृतिदिवस आज पाळला जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्लीत राष्ट्रीय पोलिस स्मारकावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख इथं चिनी सैन्याचा हल्ला मोडून काढताना, पोलिस विभागाचे दहा कॉन्स्टेबल हुतात्मा झाले होते. त्यांच्यासह देशभरात विविध मोहिमांमध्ये आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या पोलिसांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी हा दिवस पाळला जातो.

महाराष्ट्र पोलिस दलानेही एका ट्विट संदेशातून हुतात्मा पोलिसांना अभिवादन केलं आहे 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याचा मान राखत जीवाची पर्वा न करता देशसेवा करणाऱ्या सर्व हुतात्मा पोलिसांना सलाम, असं या संदेशात म्हटलं आहे.

****

जम्मू-काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यातील गगनगीर भागात दहशतवाद्यांनी एका काश्मिरी डॉक्टर आणि ६ बांधकाम कामगारांची हत्या केली. सोनमर्गच्या झेड-मोड बोगदा परिसरात बांधकामाच्या ठिकाणी ही घटना घडली. दोन दहशतवाद्यांनी एका खासगी कंपनीच्या खानावळीमध्ये घुसून गोळीबार केला. यावेळी मारले गेलेले डॉ.शहनवाज हे बडगाम जिल्ह्यातील नैदगाम इथले रहिवासी होते. गेल्या तीन दिवसांतील मजुरांना लक्ष्य करण्यात आलेला हा दुसरा दहशतवादी हल्ला आहे.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी हा भ्याड हल्ला असल्याचं म्हटलं आहे, या घृणास्पद हाल्ल्याचे चोख उत्तर दिले जाईल असा इशाराही त्यांनी दिला आहे. मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनीही या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला आहे.

****

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेअंतर्गत यावर्षीच्या ऑगस्ट महिन्यात १८ लाख ५३ हजार निव्वळ सदस्य जोडले गेले आहेत. कामगार आणि रोजगार मंत्रालयाकडून ही माहिती देण्यात आली. या महिनाभराच्या काळात सुमारे नऊ लाख ३० हजार नवीन सदस्यांनी नोंदणी केली असून, नव्या सदस्यांपैकी अडीच लाखापेक्षा जास्त महिला सदस्य असल्याचं. याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. ही आकडेवारी म्हणजे देशभरात रोजगाराच्या संधी वाढल्या असल्याचेच स्पष्ट संकेत आहेत, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

****

राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंत सी व्हिजिल या ऍपवर ६६७ तक्रारी आल्या असून त्यातल्या ६६० तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत. राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉक्टर किरण कुलकर्णी यांनी ही माहिती दिली. आचारसंहिता लागू झाल्यानंतर शासकीय, सार्वजनिक, खासगी जागेतल्या विनापरवानगी लावलेल्या जवळपास सात लाख जाहिराती काढण्यात आल्या, तसंच बेकायदेशीर रोकड, मद्य, अंमली पदार्थ इत्यादी मिळून १४ कोटी ९० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहितीही कुलकर्णी यांनी दिली.

****

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात पोलिसांच्या गुन्हे शाखेनं दहाव्या आरोपीला अटक केली आहे. हा आरोपी नवी मुंबईतील एक भंगार व्यापारी असून मुख्य आरोपींना शस्त्र पुरवल्याच्या आरोपाखाली त्याला अटक करण्यात आली आहे. त्याला २६ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

****

नांदेड पोलीस परिक्षेत्रात अवैध मद्य विक्री करणाऱ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत साडे आठ लाख रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला तर २१२ गुन्हे दाखल करण्यात आले. नांदेड पोलीस परिक्षेत्राचे उपमहानिरीक्षक शहाजी यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आलेल्या या मोहिमेत नांदेड, परभणी, हिंगोली आणि लातूर या चारही जिल्ह्यातील पाच अप्पर पोलीस अधीक्षक सहभागी झाले होते.

****

परभणी महानगरपालिकेच्या धर्मापुरी जलशुद्धीकरण केंद्रावर अमृत पाणी पुरवठा योजनेच्या पहिल्या टप्प्यांअंतर्गत करण्यात येत असलेल्या कामामुळे शहराचा पाणीपुरवठा आजपासून तीन दिवस बंद राहणार आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा काळजीपूर्वक वापर करावा, असं आवाहन परभणी शहर महानगरपालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथल्या जायकवाडी धरणातून विसर्ग वाढवण्यात आला आहे. अहिल्यानगर तसंच नाशिक जिल्ह्यातून होणारी पाण्याची आवक १२ हजार घनफूट प्रतिसेकंद पेक्षा अधिक झाली असल्यानं, धरणाचे १८ दरवाजे उघडून सुमारे १९ हजार घनफूट प्रतिसेकंद वेगानं गोदावरी नदीपात्रात पाणी सोडलं जात आहे. धरणाचा पाणीसाठा शंभर टक्के झाला आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या परतूर तालुक्यातल्या निम्न दुधना प्रकल्पाच्या दहा दरवाजाद्वारे नदीपात्रात १६ हजार ७०० घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. प्रकल्पात सध्या ७५ टक्के जिवंत पाणीसाठा आहे. नदीकाठच्या गावांना प्रशासनानं सतर्कतेचा इशारा दिला आहे.

****

नाशिक जिल्ह्यात परतीच्या पावसामुळे जवळपास  ३८ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील पिकं जमीनदोस्त झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागानं वर्तवला आहे. चांदवड, देवळा, कळवण, त्रंबक आणि बागलाणमध्ये मका, कांदा भातपिक तसंच द्राक्षांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचं जिल्हा कृषी अधीक्षक कैलास शिरसाट यांनी सांगितलं.

****

हाँगकाँग इथं झालेल्या आशियायी क्रॉस कंट्री धावण्याच्या स्पर्धेत भारतीय धावपटूंनी सात सुवर्णपदकांची कमाई केली आहे. यात तीन वैयक्तिक सुवर्णपदकांचा समावेश आहे. धावपटू गुलवीर सिंह आणि सीमा यांनी या स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलं.

****